<u>महत्त्वाचे</u>

अति.महा.आयुक्त (ज) कार्यालय
पुणे महानगपालिका
जा.क्र.अतिमआ(ज)/ ८२३०
दिनांक - २८/१०/२०२०

## - कार्यालयीन आदेश -

विषय : मा.स्थायी समिती बैठकीमध्ये खातेप्रमुख यांचे उपस्थितीबाबत.

संदर्भ : कार्यालयीन आदेश जा.क्र.अतिमआ(ज)/१६५५, दि.२८.०५.२०२०.

कोव्हिड-१९ च्या अनुषंगाने मा.स्थायी समितीच्या बैठकीमध्ये खातेप्रमुख यांचे उपस्थितीबाबत यापूर्वीच संदर्भांकित कार्यालयीन आदेश प्रसृत करण्यात आलेले आहे. दि.२७.१०.२०२० रोजी झालेल्या मा.स्थायी समितीचे बैठकीला अनेक खातेप्रमुख ऑनलाईन अनुपस्थित असल्याचे आढळून आले. खाते प्रमुखांच्या सदर अनुपस्थितीची गंभीर दखल घेत मा.स्थायी समिती अध्यक्ष व सदस्य यांनी तीव्र नाराजी व्यक्त केलेली आहे. खाते प्रमुखांनी मा.स्थायी समितीचे बैठकीस पूर्वपरवानगी शिवाय अनुपस्थित राहणे ही बाब प्रशासकीय शिस्त भंग करणारी आहे.

मा.स्थायी समिती बैठकीमध्ये खातेप्रमुख यांचे उपस्थितीबाबत खालीलप्रमाणे सुधारित आदेश प्रसृत करण्यात येत आहे.

१. सदर बैठकीस खालील खातेप्रमुख यांनी उपस्थित राहणे अनिवार्य राहील.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | शहर अभियंता | ६. | सह आयुक्त (कर आकारणी व कर संकलन) |
| २. | मुख्य अभियंता (पाणीपुरवठा, मलनिःसारण) | ७. | मुख्य लेखा व वित्त अधिकारी |
| ३. | मुख्य अभियंता (पथ) | ८. | उप आयुक्त (परिमंडळ क्र.१ ते ५ ) |
| ४. | मुख्य अभियंता (विद्युत) | ९. | उप आयुक्त (मालमत्ता व्यवस्थापन) |
| ५. | सह आयुक्त (घनकचरा व्यवस्थापन) | | |

२. मा.स्थायी समितीचे कार्यपत्रिकेवर असणाऱ्या विषयाशी संबंधीत खातेप्रमुख तसेच आयत्यावेळचे विषयाशी संबंधित खातेप्रमुख यांनी मा.स्थायी समितीच्या बैठकांना नियोजित वेळेपूर्वी समितीचे सभागृहात उपस्थित राहावे.

३. पूर्वपरवानगी शिवाय बैठकीस अनुपस्थित असल्याचे आढळून आल्यास संबंधीत अनुपस्थित खातेप्रमुख यांचेवर शिस्तभंगाची कारवाई केली जाईल याची नोंद घ्यावी.

Rubal 28/10/2020

(रुबल अग्रवाल)
अतिरिक्त महापालिका आयुक्त (जनरल)
पुणे महानगरपालिका

प्रतिलिपी :

मा.महापालिका आयुक्त
मा.अतिरिक्त महापालिका आयुक्त (वि/इ)
यांजकडेस माहितीसाठी....

प्रत :

सर्व खातेप्रमुख
यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी...